**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1409/2007 व अपील कमांक 1410/2007.**

**<u>अपील कमांक 1409/2007</u>**

श्री देवेन्द्र शिलपतराव पर्वतकर

द्वारा–श्री सुभाष जवंजाळ, शिवशक्ती नगर,

सूतगिरणी रोड, अमरावती ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

1) श्री एस. के. पवार,

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद अमरावती

2) श्री प्रदिप नानोटे,

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल,

जलाराम नगर, अमरावती ..... उत्तरवादी

**<u>अपील कमांक 1410/2007</u>**

श्री प्रभाकर रामराव धुरंधर

द्वारा अशोक नाईक, कैलास नगर,

गोपाल नगर जवळ, बडनेरा रोड, अमरावती.

**विरुध्द**

1) श्री एस. के. पवार

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद अमरावती

2) श्री प्रदिप नानोटे,
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल,
जलाराम नगर, अमरावती ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपील क्रमांक 1409/2007 मध्ये दिनांक 17.10.2007 रोजी अपील क्रमांक 1410/2007 मध्ये दि. 18.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. दोनही अपीलकर्ता हजर आहेत. व व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1409/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.2.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवकृपा गर्ल्स हायस्कूल, जलाराम नगर, अमरावती यांचेकडे Information regarding 1) Approval Teaching and Non teaching staff 2005-05-06
2) 2004-2006 Pay bill slip
महिती रजिस्टर पोष्टाने मागितलेली दिसून येते.

अपील क्रमांक 1410/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे Information regarding inspection notes 1997-1999. Copy of the Management body 1997-1999.
अशी महिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.

4. सदरच्या दोनही अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध नाही म्हणून दोनही अपीलकर्त्यांनी दि. 28.3.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.) याचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.3.2006 रोजी दिलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे व माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमूद केल्याप्रमाणे दोन द्वितीय अपीले दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 28.2.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सांगितले व त्याप्रमाणे जा. क्र. एसजीएचएएमटी/71/06 व जा. क्र. एसजीएचएएमटी/72/06 व त्याकरीता प्युन डाक बुकमध्ये युपीएससी ने माहिती पाठविली व त्यावर पोष्टाचा स्टम्प आणि शिक्का आहे असा पुरावा सादर केलेला आहे. परंतु दोनही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरचे पत्र त्यांना मिळालेली नाही. त्यांना इतर सर्व पत्रे मिळाली होती. सदरची दोनही पत्रे त्यांना मिळालेले नाही. त्यांनी रजिस्टर पोष्टाने माहिती मागितलेली होती खर्च भरण्याची तयारी होती परंतु त्यांना खर्च मागितला नाही व माहितीही उपलब्ध करुन दिली नाही. ''प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.7.2006 रोजी दिलेला असून असे दिसून येते की ''सुनावणी दौरान असे निदर्शनास आले अर्जदाराला दि. 28.2.2006 ला युपीएससी द्वारे माहिती पाठविण्यात आली होती. अर्जदाराला विचारणा केल्यानंतर माहिती मिळाली नाही व आम्हाला माहिती पाहिजे आहे अशी विनंती करण्यात आली.'' माहिती देण्याकरीता दि. 2.5.2006 ला मुख्याध्यापकाना माहिती पुरविण्याकरीता निर्देश दिले परंतु माहिती देण्यात आली नाही. पुन्हा मुख्याध्यापकाना दि. 10.5.2006 पर्यंत माहिती देण्याकरीता कळविले. मुख्याध्यापकाचे पत्र क्र. एस जी एस/309/06 दि. 14.6.2006 नुसार अपीलकाराना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल कळविले. वरील माहिती वेळेवर न दिल्यामुळे मुख्याध्यापक स्वतः

जबाबदार आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु दि. 14.6.2006 रोजी अपीलकारानी माहितीच्या अधिकारातील मुख्याध्यापकाना माहिती मागितली व अपीलकाराला दि. 28.2.2006 रोजी पोस्टानी माहिती दिली. पुन्हा त्यावर 2.5.2006 रोजी आपल्या कार्यालयात सुनावणी झाली असता माहिती दिल्याचे दिसून आले करीता पुन्हा अपीलकाराने माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली तर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल करीता आपले माहिती करीता सादर असे शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना कळविलेले दिसून येते. पुन्हा दि. 8.8.2006 रोजी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दि. 28.2.2006 ला यु पी सी ने माहिती दिल्यामुळे मुख्याध्यापक जबाबदार राहणार नाही असे कळविलेले दिसून येते. कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिका–याने कोणत्याही प्रकरणातील निर्णयाच्या संदर्भामध्ये सदरचा निर्णय हा जावक क्रमांक देवून पोष्टानी पाठविला असल्यास तसा पुरावा असल्यास ती प्रक्रिया पूर्ण झाली असे गृहित धरले जाते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की पोष्टानीच पाठविले नसले तर त्यांना मिळणार नाही. परंतु डाक बुकामध्ये पोष्टाचा स्टॅम्प दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी तोंडी असेही सांगितले की पोष्टामध्ये चौकशी झालेली होती. पुन्हा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये त्यांचे अपील होते व माहिती न मिळाल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात आले. परंतु प्रशासकीय न्यायाधिकरणास कोणत्याही प्रकारची माहिती पुराव्यादाखल मागविण्याचा अधिकार असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्या प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सदरची माहिती मागविली असती तर ती मुख्याध्यापकाना सादर करावी लागली असती व तशी मुख्याध्यापकानी सादर केली होती असे सांगितले. त्यामुळे सदरची माहिती न मिळाल्यामुळे अपील खारीज झाले हे म्हणणे गृहित धरता येणार नाही. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती आजही पुन्हा हवी असली तर जन माहिती अधिकारी सदरची

माहिती दोनही अपीलकारांना रजिस्टर पोष्टाने विनामुल्य पाठविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे दोनही अपीले हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून त्यांनी त्यांचे दि. 16.2.2006 च्या अर्जावर दिलेल्या पत्त्यावर अर्जातील मागितलेल्या प्रमाणे मुद्येनिहाय माहिती छायांकित प्रतिसहित रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.4.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.